| MHKO070009012025 | **<u>रे.क.नं.१०७/२०२५</u>**<br>अजिज काशीम नदाफ<br>विरुध्द<br>नुरजहा लाडसाहब नदाफ आणि इतर |
| --- | --- |

<u>निशाणी क्र.२५ खालील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ यांनी कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ होवुन कैफियत रेकॉर्डवर घेणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

**०२.** प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांचे अर्जात असे कथन केले आहे की, सदरचे काम हे आजरोजी नेमलेले असुन प्रतिवादी क्र.१ हे आजरोजी आपली कैफियत दाखल करत आहेत. परंतू नजरचुकीने व अनावधानाने प्रतिवादी क्र.१ यांना कैफियत दाखल करण्यास ३३ दिवसांचा विलंब झालेला आहे. वास्तविक प्रतिवादी क्र.१ यांना समन्स हे दि.११/०७/२०२५ रोजी लागू झाले असुन प्रतिवादी क्र.१ हे दि.१७/०७/२०२५ रोजी सदर कामी हजर झालेले आहेत. परंतू प्रतिवादी यांना सदर कामी दाखल करावयाची कागदपत्रे वेळेत मिळाली नसल्याने कैफियत दाखल करण्यास ३३ दिवसांचा विलंब झालेला आहेत. प्रतिवादी क्र.१ या अशिक्षीत व अडाणी स्त्री असुन त्यांना कायदयाचे ज्ञान नाही. प्रतिवादी क्र.१ यांना शुगरचा त्रास असल्याने त्या आजारी असतात. त्यामुळे देखील वेळेत कैफियत दाखल करणे अशक्य व अडचणीचे झाले होते. प्रतिवादी क्र.१ यांचा सदरचा अर्ज मंजुर केल्यास वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट प्रतिवादी क्र.१ यांची कैफियत दाखल करुन न घेतलेस प्रतिवादी क्र.१ यांचे अतोनात असे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. तरी न्यायाचे कारणास्तव प्रतिवादी क्र.१ यांचा अर्ज मंजुर करण्यात यावा अशी विनंती सदर प्रतिवादी यांनी केलेली आहे.

**०३.** वादी यांनी त्यांचे म्हणणे नि.क्र.२७ वर देवुन कथन केले आहे की, यातील प्रतिवादी क्र.१ यांनी नि.२५ कडील दिलेला अर्ज खोटा व लबाडीचा असुन सदर वादी यांना तो मान्य व कबुल नाही. सदर प्रतिवादी क्र.१ यांनी कैफियत देणेसाठी दिलेली कारणे असू शकत नाहीत. सदर प्रतिवादी क्र.१ यांनी कैफियत देणेसाठी विलंब बाबत कोणतेही समाधानकारक कारण दिलेले नाही. सबब मे. कोर्टास विनंती की, सदरचा अर्ज रक्कम रु.१०००/- इतक्या

कॉस्टसह नामंजुर करण्याची मागणी केली आहे.

**०४.** उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकला. वादीने प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादींविरुध्द वाटप, तुटक कब्जा, हिब्बानामा रद्दबातल होवुन मिळणेकरिता, हक्कज्ञापण आणि कायम मनाई ताकीद होवुन मिळणेसाठी दाखल केलेला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र.१ यास कैफियत दाखल करणेसाठी उशीर झाल्याचे दिसून येते. प्रतिवादी क्र.१ यांची कैफियत रेकॉर्डवर आल्यास वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नसून केसच्या दोन्ही बाजू मे.कोर्टासमोर येवून न्यायदानास मदतच होणार आहे. प्रत्येक दावा हा गुणदोषावर निकाली निघणे आवश्यक आहे. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार करता प्रस्तुतचा अर्ज हा मंजूर करुन प्रतिवादी क्र.१ यांची कैफियत स्विकारणे आवश्यक आहे. त्यामुळे अर्जातील कारण पाहता प्रतिवादी क्र.१ ला संधी देणे हे विधीसंगत दिसून येत आहे. तसेच प्रतिवादी क्र.१ ला कैफियत दाखल करणेस संधी देताना त्यांनी घेतलेल्या वेळेच्या अनुषंगाने वादीला खर्च देणे देखील गरजेचे आहे. सदर विलंब हा जास्त कालावधीचा नाही. करिता खालील आदेश पारीत करण्यात येतो–

**– आदेश –**

१. प्रस्तुतचा अर्ज (निशाणी क्र.२५) हा प्रतिवादी क्र.१ यांनी खर्च म्हणून वादी यांना र.रू.१००/– (र.रु.शंभर फक्त) देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१ यांची कैफियत खर्चाची पुर्तता झाल्यास अभिलेखावर घेणेत यावी.

३. खर्चाची पुर्तता पुढील तारखेस किंवा तत्पुर्वी करावी.

४. दोन्ही पक्षांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

दि.०७/०१/२०२६ **(अ.त्रिं. मनगिरे)**

जयसिंगपूर. सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),

जयसिंगपूर,ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Sou. P. S. Musale |
| Name of Court | Jt.C.J.J.D.& J.M.F.C., Jaysingpur. |
| Date of Dictation. | 07/01/2026. |
| Judgment/order signed by the PO on | 07/01/2026. |
| Judgment/order uploaded on | 07/01/2026. |